## Indian Academy of Pediatrics (IAP)

### महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

**प्रकरण २० :**

# आपल्या पाल्यामध्ये विशिष्ट अध्ययन अक्षमता असल्याची शंका पालकांना कधी यायला हवी ? किंवा कधी घ्यावी ?


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया
सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार
मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक : डॉ. नरेंद्र नानीवडेकर
अनुवादक : डॉ. संतोष निंबाळकर
पुनरावलोकन : डॉ. सुचित तांबोळी
उज्ज्वल करमळकर

*Convener:* Sheffali Gulati
*Members:* Chetan B Shah,
Lokesh Saini,
Vijay K Kulkarni
*Reviewer:* Samir Dalwai




पूर्वी एखाद्या मुलाला लिहिता वाचता आले नाही की त्याला "ढ" म्हणून हिणवले जाई. पण शिक्षणाच्या आणि वैद्यकीय क्षेत्रात प्रगती झाल्यावर ह्या अध्ययन क्षमतेचे दोष लक्षात येऊ लागले. आता तज्ञ काय म्हणताहेत हे पाहुया.

### आपल्या पाल्यामध्ये विशिष्ट अध्ययन अक्षमता असल्याचा निर्देश करणाऱ्या दहा प्रमुख बाबी पुढील प्रमाणे :-

प्र.१ आम्ही ५ वी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक आहोत. त्याच्या शिक्षकांनी अलिकडेच आम्हाला बोलावून घेतले आणि आपल्या पाल्य सर्वसाधारणपणे हुशार आहे. पण शालेय अभ्यासातील त्याची गती संथ असल्याची तक्रार त्यांनी केली. त्याच्या अभ्यासातील प्रगती बाबत काळजी घ्यावी लागेल असे त्यांनी सांगितले. आमच्या पाल्यामध्ये कदाचित विशिष्ट अध्ययन अक्षमता असू शकेल असे ते म्हणाले. आम्हाला खूप काळजी वाटत आहे. ही विशिष्ट अध्ययन अक्षमता (एस.एल.डी) म्हणजे काय ते तुम्ही कृपया सांगा.

प्र.२ शाळेतील त्याचा अभ्यास असमाधानकारक असण्यामागे विशिष्ट अध्ययन अक्षमता सोडून आणखी काही कारणे असतात काय ?

प्र.३ गर्भारपणातील सर्व तपासण्या समाधानकारक होत्या. प्रसूती कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडली. आमच्यापैकी कोणालाच अशा प्रकारची समस्या नाही, तरीही माझ्या पाल्यामध्ये अध्ययन अक्षमता कशी आली ?

प्र.४ विशिष्ट अध्ययन अक्षमतेच्या (SLC) विविध प्रकारांबद्दल तुम्ही कृपया तपशीलवार माहिती देऊ शकता का ?

प्र.५ याबाबत आम्हाला या आधी शंका का आली नाही. किंबहुना त्याच्या यापूर्वीच्या शिक्षकांनाही तशी शंका का आली नाही ? शालेय रचनेमध्ये एस.एल.डी.ची लक्षणे ठरवण्याच्या कोणत्या पद्धती आहेत ? बालपणी ज्यांच्यात एस.एल.डी. लक्षणे दिसली नव्हती किंवा ओळखली गेली नव्हती, अशा शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या पाल्यामधील विशिष्ट अध्ययन अक्षमता कशी ओळखावी ?

प्र.६ शाळेतील शिक्षकांनी आम्हाला बालरोग तज्ज्ञांना भेटण्यास सांगितले आहे. एस.एल.डी. निदान आणि व्यवस्थापन यामध्ये त्यांची भूमिका काय असते ?

प्र.७ सर्व परामर्श घेतल्यानंतर बालरोगतज्ञाने आम्हाला मानसोपचार तज्ज्ञांकडे पाठवले. वैद्यकीय मानसोपचारतज्ज्ञांची भूमिका आम्ही जाणून घेऊ शकतो का ?

प्र.८ एस.एल.डी. असलेल्या आमच्या पाल्याला आम्ही कोणत्या पद्धतीने मदत करु शकतो ? यामध्ये विशेष प्रशिक्षकाची वैद्यकीय भूमिका असते असे आम्ही ऐकले आहे आणि उपचारात्मक हस्तक्षेपाच्या उपायाबद्दल कृपया आम्हाला माहिती द्यावी. पाल्यासमोरील आव्हानांना आम्ही कसे समोरे जाऊ शकतो ?

प्र.९ शाळेच्या रचनेमध्ये आणि आयुष्यातही त्याच्यासाठी कोणत्या खास सवलती असाव्या लागतील ? तो कधी स्वतंत्र होईल का ?

प्र.१० एस.एल.डी. बालकांसाठी भारत सरकार काही करत नाही काय ? भारत सरकराच्या विविध मदत गटाविषयी कृपया आम्हाला माहिती द्या. त्याच बरोबर "एन.सी.ई.आर.टी" सारख्या इतर शैक्षणिक संस्थामधील मदत गटाविषयी माहिती द्या. एस.एल.डी. असलेल्या मुलांसाठी योग्य अशा करिअर पर्यायांची माहिती कृपया आम्हाला द्यावी. "एन.सी.ई.आर.टी" आणि महाविद्यालये त्यांच्या शिक्षणात कोणती मदत करतात ? त्यांच्यासाठी करिअरचे उत्तम पर्याय कोणते आहेत ?


**Under the Auspices of the IAP Action Plan 20202021**

**Piyush Gupta** – IAP President 2021
**Remesh Kumar R** – IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** – IAP President 2020
**GV Basavaraja** – IAP HSG 20202021
**Deepak Ugra** – National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** **Piyush Gupta, Bakul Parekh**
**IAP Co-ordinators:** **GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure**

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***


20

# आपल्या पाल्यामध्ये विशिष्ट अध्ययन अक्षमता असल्याची शंका पालकांना कधी यायला हवी ? किंवा कधी घ्यावी ?


**प्र.१**

**आम्ही ५ वी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक आहोत. त्याच्या शिक्षकांनी अलिकडेच आम्हाला बोलावून घेतले आणि आपला पाल्य सर्वसाधारणपणे हुशार आहे. पण शालेय अभ्यासातील त्याची गती संथ असल्याची तक्रार त्यांनी केली. त्याच्या अभ्यासातील प्रगतीबाबत काळजी घ्यावी लागेल असे त्यांनी सांगितले. आमच्या पाल्यामध्ये कदाचित विशिष्ट अध्ययन अक्षमता असू शकेल असे ते म्हणाले. आम्हाला खूप काळजी वाटत आहे. ही विशिष्ट अध्ययन अक्षमता (एस.एल.डी) म्हणजे काय ते तुम्ही कृपया सांगा.**

बुध्यांक कमी नसतांना (आय क्यू) मेंदू सुस्थितीत असताना, शाळा सुमार दर्जाची नसताना किंवा ऐकण्यात तसेच दिसण्यात कोणतीही अडचण नसतानाही जेव्हा पाल्याची शालेय प्रगती अनपेक्षितपणे निराशजनक दिसू लागते, तेव्हा त्या स्थितीला विशिष्ट अध्ययन अक्षमता असे म्हटले जाते. मुलाला वाचन, लेखन, गणिती आकडेमोड यासारखी कौशल्य मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो तथापि विशिष्ट कौशल्य वगळता इतर क्षेत्रात तो कसाबसा उत्तीर्ण होण्याच्या पातळीवर पोहोचतो, वाचन, लेखन, आकडेमोड यातील अडचणींमुळे त्याची शालेय प्रगती असमाधानकारक असते. मात्र अभ्यास वगळता इतर क्षेत्रात तो तुलनेने चांगला असतो. दुसऱ्या निकषांमध्ये तो चांगली कामिगरी करतो. उदा. डीस्लेक्सीया असणारे मुल संगणक किंवा खेळ या क्षेत्रात खूप चांगली कामगिरी करते.



डीस्लेक्सीया - वाचण्यात अडचणी



डीसकॅलकुलीया - आकडेमोडीत अडचणी



डीस्ग्राफीया - लिहिण्यात अडचणी

## प्र.२

## शाळेतील त्याचा अभ्यास असमाधानकारक असण्यामागे विशिष्ट अध्ययन अक्षमता सोडून आणखी काही कारणे असतात काय?

होय, त्यामागे अनेक कारणे आहेत उदा. कमी बुध्यांक असल्यामुळे मेंदू विषयक आजार असणे तसेच विकास प्रक्रियेतील संथपणा.

हृदयाच्या आजारासह मेंदूविषयी आजार,न्यूमोनियाची वारंवारता आणि पोषक अन्नाची कमतरता.

दृष्टी विषयक आणि ऐकण्यामधील अडचणी,

मेंदूच्या विकासासंबंधी अडचणी, दुर्लक्षामुळे असणाऱ्या चंचलतेचा आजार. (एस.एल.डी. आटेन्शन डेफीसीट हायपर ॲक्टीविटी डिसऑर्डर) स्वमग्नता (ऑटीझम)

निम्नस्तरीय शालेय स्थिती, शाळेतील गैरहजेरी, गुंडगिरी किंवा अति लाड.

वातावरणासंबंधीच्या अडचणी जसे खूप आवाज, दूरदर्शन आणि इतर सामाजिक माध्यमांचा वापर (सोशल मिडीया)

लैंगिक शोषण, दुर्लक्ष आणि पालकांमधील संवाद यासारख्या भावनिक समस्या

## प्र.३

## गर्भारपणातील सर्व तपासण्या समाधानकारक होत्या. प्रसूती कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडली. आमच्यापैकी कोणालाच अशा प्रकारची समस्या नाही, तरीही माझ्या पाल्यामध्ये अध्ययन अक्षमता कशी आली?

अध्ययन अक्षमतेमागील पारदर्शक नेमके स्पष्ट कारण विज्ञानाला अजून सापडलेले नाही. अपुऱ्या दिवसांचा जन्म, जन्मतः वजन कमी असणे, दिर्घकाळाची प्रसूती प्रक्रिया, याबरोबर अशा स्थितीचे कुटुंबातील अस्तित्व आणि मेंदूविषयक विकासात योगायोगाने दिसणारी (ओ सी डी) आणि चंचलतेचा आजार (एडी एच डी) यांचा संबंधही असतो असे दिसते.

तरीही यापैकी कोणताही जैविक घटक अध्ययन अक्षमतेचे कारण असल्याचे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे कोणत्याही एका किंवा अनेक कारणांमुळे हा आजार येतो, असा विचार करता येत नाही. गर्भारपणातील गुंतागुंत किंवा इतर आजारांमुळे हा आजार होतो, असेही निष्पन्न झालेले नाही.




**आकृत्या : अ ते ई** विशिष्ट अध्ययन अक्षमता असलेले मुल.


## प्र.४

## विशिष्ट अध्ययन अक्षमतेच्या (SLC) विविध प्रकारांबद्दल तुम्ही कृपया तपशीलवार माहिती देऊ शकता का?


बोली भाषेतील अक्षमता ही शाब्दिक किंवा अवाचीक असू शकते. शाब्दिक एस.एल.डीज अत्यंत सामान्य आहेत आणि त्यांच्यामध्ये डीस्लेक्सीयाही सामान्यपणे आढळतो. वाचन आणि त्यासंबंधीच्या अनुषांगिक प्रक्रिया कौशल्यावरुन डीस्लेक्सीया ठरवला जातो. त्यामध्ये शब्दांचे अचूक वाचन, वाचन गतीचा अचूकपणा / सफाईदारपणा आणि वाचनातील अचूकता यामध्ये मुलाला अडचणी असतात. व्यक्तीची हस्तलेखनातील क्षमता आणि उत्तम कौशल्य मिळवण्यातील अडचणी वरुन डीस्लेक्सीया निश्चित केला जातो.

उदा. मुलाला स्पेलिंगच्या अचूकतेमध्ये अडचणी येऊ शकतात त्याबरोबर व्याकरण आणि चिन्हांच्या अचूकते विषयीचे आणि विचारांचे लेखन करताना विचारांचे संकलन आणि स्पष्टता याबाबतही संभ्रम असू शकतो. डीस्लेक्सीया मध्ये आधी सांगितल्यानुसार अंक समजून घेण्यात व्यक्तीला अडचणी येतात, गणितातील संकल्पना शिकणे अवघड वाटते. विशेषत: त्यातील अंकांची जाण घेणे अवघड असते. गणिती प्रक्रिया लक्षात ठेवणेही त्याला जड जाते. अचूक आणि नियमबद्ध रितीने गणित सोडवता येत नाही. त्याबरोबर गणितातील कारणमिमांसा अचूकपणे सांगता येत नाही.

चेहऱ्यावरील भाव, देहबोली, वस्तू, गोष्टींचा समन्वय आणि अतंर, दृश्य यांचे संयोजन करण्यात येणाऱ्या अडचणी यासारख्या बाबींचा समावेश, अवाचिक (नॉन व्हर्बल) अध्ययन अक्षमता मध्ये समावेश होतो.





डीस्कॅल्कुलिया - अंकांची अत्यल्प समज, त्यातील संबंध या विषयी अज्ञान! एक अंकी संख्येच्या गणितासाठी बोटे वापरतात. अंकगणितातील आकडेमोडीतून हरवून गोंधळून जातात.





अ

व्याकरणातील अनेक प्रकारच्या चुका मुल करते. वाक्यातील विरामचिन्हे वापरताना चुका करते. परिच्छेद बनवण्याचे कौशल्य नसते. कल्पनांचे लेखन करताना विचारांमध्ये स्पष्टता नसल्याचे दिसते. शब्द, अक्षरे, यामध्ये पुरेशी जागा सोडलेली नसते.





ब

वाचनात अडचणी, वाचन जमत नाही,
शब्दांची संगती लावता येत नाही, वाचनात चुका



क

बोली भाषेतील अक्षमता - डीस्ग्राफीया लेखनात अडचणी




ड

**आकृती : २ अ ते ड**

## प्र.५

**याबाबत आम्हाला या आधी शंका का आली नाही. किंबहुना त्याच्या यापूर्वीच्या शिक्षकांनाही तशी शंका का आली नाही? शालेय रचनेमध्ये एस.एल.डी.ची लक्षणे ठरवण्याच्या कोणत्या पद्धती आहेत? बालपणी ज्यांच्यात एस.एल.डी. लक्षणे दिसली नव्हती किंवा ओळखली गेली नव्हती, अशा शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या पाल्यामधील विशिष्ट अध्ययन अक्षमता कशी ओळखावी?**

सर्वसाधारणपणे मुलांच्या शैक्षणिक कामिगरीचा आलेख खाली उतरत धोक्याच्या पातळीपर्यंत गेल्यावर काळजीचा विषय झाला असल्याचे निदान केले जाते. एक तर त्यांची शैक्षणिक कामिगरी सरासरीपेक्षा कमी दिसू लागते किंवा त्यांना शिक्षणात अडचणी येत असल्याचे दुय्यम मानसिक परिणाम दिसू लागतात. यापैकी कोणतेही एक कारण दिसले तरी एस.एल.डी.चे निदान केले जाते. या मुलांचा बुद्ध्यांक सामान्य असतो आणि कौशल्यांमध्ये अगदी कमी प्रमाणात कमतरता असते, यामुळे सुरुवातीच्या काळात त्यांचे सहजतेने निदान होऊ शकत नाही.

शालेय शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षक आणि पालक दोघेही पाल्यातील एस.एल.डी. च्या वेगवेगळ्या वर्तन चिन्हे आणि लक्षणासंबंधी जागृत असायला हवेत. लक्ष देण्याची अत्यल्पवेळ, अल्प स्मरणशक्ती, निदर्शनानंतर ही त्याप्रमाणे जाण्यात अडचणी, दोन किंवा अधिक अक्षरे, संख्या किंवा आवाज यातील फरक ओळखण्यात अडचण, वाचन, लेखनातील कच्चेपणा किंवा गणित समजून घेण्यात अडचणी, डोळे आणि हात यांच्यातील समन्वय साधताना येणाऱ्या अडचणी, अत्यल्प समन्वय, क्रम आणि विस्कळीत बाबी बद्दल अडचण आणि इतर ज्ञानेंद्रियाबद्दलच्या, संवेदनांबद्दलच्या अडचणी योग्य साधनांचा वापर करुन तसेच कुटुंबाआणि शिक्षकांना सामावून याबाबतच्या चाचण्या छाननी शक्य तितक्या लवकर व्हायला हवी. या छाननीत मुलांच्या दृष्टी आणि श्रवण दोषांच्या छाननीचाही समावेश हवा.

एस.एल.डी. असलेली मोठी मुले किंवा प्रौढ व्यक्तीनाही अशाच समस्या भेडसावत असतात. जसे वाचन व लेखन त्यांना “मूर्ख विद्यार्थी” किंवा “समस्या निर्माण करणारा”असे संबोधले जाते.

---

अध्ययन अक्षमता बाबत शिक्षकांनी करण्याची छाननी,

विद्यार्थ्याचे नांव :-

जन्मदिनांक :-

वर्ग :-

शाळेचे नांव :

शिक्षक विद्यार्थ्याला किती दिवसापासून ओळखतो ?

प्रिय शिक्षक

---

प्रिय शिक्षक

आपल्या दैनंदिन शिकवण्यामध्ये विद्यार्थ्यांच्या पुढीलपैकी काही अडचणी येत असल्याचे तुमच्या निदर्शनास आले आहे काय ?

तुमचे उत्तर X या खुणेने योग्य त्या रकान्यात द्या.

| अ.क्र. | तुमचा अनुभव | कधीच नाही | अधूनमधून | वारंवार |
|---|---|---|---|---|
| १. | वाचन करताना चुका करतो. असे<br>शब्द गाळतो.<br>पर्यायी शब्द वाचतो.<br>ओळी सोडतो.<br>नवीन शब्दाची भर घालतो.<br>वाक्ये पुन्हा पुन्हा वाचतो. | | | |
| २. | तोंडी उत्तरे देऊ शकतो.<br>पण लिहितांना त्याला अडचणी येतात किंवा तोंडी कामगिरी लिखित कामापेक्षा चांगली आहे ? | | | |
| ३. | अंक किंवा अक्षरे चुकीच्या पद्धतीने वाचतो किंवा लिहीतो. उदा. ५१ साठी १५, आणि डी साठी बी | | | |
| ४. | उच्चारावरुन अक्षरात होणारे फरक ओळखण्यात अडचण येते.<br>उदा. आय साठी ई आणि श साठी च. | | | |
| ५. | यमक असलेले शब्द उच्चारण्यात अडचण त्यामुळे त्याचा पुन्हा पुन्हा उच्चार | | | |
| ६. | समोरचे शब्द वर्तमान काळात असतात. भूतकाळात वाचतो किंवा या उलट उदा. वॉज च्या जागी इज वाचतो. | | | |
| ७. | वाचताना अक्षरांचा क्रम बदलतो.<br>उदा. Green च्या जागी neerg असे वाचतो | | | |
| ८. | जास्त लांबीचा शब्दाच्या जागी छोटे करुन वापरतो.<br>उदा. musim to museum. | | | |
| ९. | नोट्स काढण्यात अडचणी येतात किंवा पुस्तक अथवा फळ्यावरुन उतरुन घेताना अडचणी येतात. | | | |
| १०. | गणितातील चिन्हाबाबत गोंधळ उडतो. (+, , ×, ÷), गणितातील आकडेमोड आणि उदाहरणे सोडवताना अडचणी येतात | | | |
| ११. | स्पेलिंग मध्ये अडचणी येतात | | | |
| १२. | दिशा, अवकाश आणि अंतर यामध्ये अडचणी येतात.<br>उदा. डावे आणि उजवे, पूर्व आणि पश्चिम,<br>वर आणि खाली | | | |
| १३. | पहिल्या आणि दुसऱ्या लिपीत गोंधळ करतो.<br>उदा. BeTTer, n for N, I for l. | | | |
| १४. | आरशातील प्रतिमा दिसते. त्याप्रमाणे लिहितो.<br>उदा. Ram for mar | | | |


* कधीकधी २ ते ३ महिन्यात ६-७ वेळा

** बहुतांशी २ ते ३ महिन्यात ७ पेक्षा जास्त वेळा

## प्र.६

## शाळेतील शिक्षकांनी आम्हाला बालरोग तज्ज्ञांना भेटण्यास सांगितले आहे. एस.एल.डी. निदान आणि व्यवस्थापन यामध्ये त्यांची भूमिका काय असते?

एस.एल.डी. चे निदान आणि व्यवस्थापन यामध्ये तुमच्या बालरोग तज्ज्ञांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. तुमचा पाल्य एस.एल.डी. च्या निकषांमध्ये बसतो की नाही हे तो ठरवतो. अध्ययन अक्षमतेचे कारण ठरु शकतील अशा इतर बाबींचे परीक्षण त्याला/तिला करावे लागते. या इतर बाबींमध्ये आधी सांगितल्यानुसार पुढील गोष्टींचा समावेश होतो. दृष्टी आणि श्रवणदोष, केंद्रीय मज्जासंस्था (ऑरगॅनिक सेंट्रल नर्वस सिस्टम/सी एन एस) (मेंदू आधारित) आणि नॉन सी एन एस आजार आणि इतर अस्तित्वात असलेल्या मानसिक स्थिती तुमचा बालरोगतज्ज्ञ तुमच्या मुलाची तपासणी करेल आणि विशिष्ट चाचण्या करुन घ्यायला सांगेल. एस. एल.डी.चा मुखवटा घालून इतर कोणताच आजार मुलाला त्रास देत नाही, याबद्दल तुमच्या बालरोगतज्ज्ञांची खात्री होणे आवश्यक आहे .



## प्र.७

**सर्व परामर्श घेतल्यानंतर बालरोगतज्ञाने आम्हाला मानसोपचार तज्ञांकडे पाठवले. वैद्यकीय मानसोपचारतज्ञांची भूमिका आम्ही जाणून घेऊ शकतो का?**

एस.एल.डी.चे निदान करण्यासाठी वैद्यकीय मानसोपचार तज्ञ बुद्धांकासाठी निर्धारित केलेल्या काही प्रमाणित चाचण्या घेईल. (बुध्यांक सरासरी किंवा त्यापेक्षा जास्त आहे हे पाहण्यासाठी) तसेच मानस-शैक्षणिक चाचण्या घेऊन त्याद्वारे वाचन, लेखन, गणित, श्रवण आणि दृष्टी संदर्भातील प्रक्रिया इत्यादी. अशा घटकातील अडचणी शोधून काढेल. त्यामुळे एस.एल.डी. निदान आणि प्रमाणीकरण ठरवण्यास मदत होईल. जर बालरोगतज्ञाला वर्तणूक आणि भावना-शीलता याबाबत धोक्याच्या गोष्टी जाणवल्या असतील तर त्यासंबंधी प्रामाणिक चाचण्या घेऊन वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ मुल्यांकन करील. वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ त्या बाबीसंबंधी बालरोग-तज्ञांच्या अवलोकनासाठी तपशीलवार अहवाल तयार करील.

तो अहवाल आणि त्यांचे प्राथमिक परीक्षण त्याच्या आधारे बालरोग तज्ञ समुपदेशा-साठी तुम्हाला मानसोपचार तज्ञांकडे जाण्यासंदर्भात मार्गदर्शन करतील. (मुल किंवा पालक) किंवा शैक्षणिक मदतीसाठी उपचारतज्ञाकडे जाण्यास सांगतील. समन्वयातील अडचणी, स्थिर, बैठक, अवधान देण्याच्या काळाबाबत उपचार व मार्गदर्शन करतील.

## प्र.८

**एस.एल.डी. असलेल्या आमच्या पाल्याला आम्ही कोणत्या पद्धतीने मदत करु शकतो? यामध्ये विशेष प्रशिक्षकाची वैद्यकीय भूमिका असते असे आम्ही ऐकले आहे आणि उपचारात्मक हस्तक्षेपाच्या उपायाबद्दल कृपया आम्हाला माहिती द्यावी. पाल्यासमोरील आव्हानांना आम्ही कसे समोरे जाऊ शकतो?**

विशेष प्रशिक्षक प्रत्येकाला एकास एक असे थेट प्रशिक्षण देतो. ते तुमच्या मुलाच्या अध्ययन क्षमतेला अनुसरुन असते. त्याचबरोबर तुमच्या मुलाचा सध्याचा शैक्षणिक दर्जा (त्याची ग्रेड नव्हे) विचारात घेतला जातो. एस.एल.डी. साठी थेट प्रशिक्षणाद्वारे किंवा छोट्या गटांमध्ये प्रशिक्षणाद्वारे शिक्षण प्रक्रियेत हस्तक्षेप करता येतो. (थेट प्रशिक्षक अधिक फायदेशीर) निश्चित निदान झाल्यानंतर विशेष प्रशिक्षकाची भूमिका सुरु होते. त्याचबरोबर उपचारात्मक हस्तक्षेप उपक्रमात मुलाला मदत करणाऱ्या विविध प्रकारांवर लक्ष केंद्रित केले जाते. त्या प्रकारामुळे तुम्हाला मुलाला अपेक्षित शैक्षणिक कौशल्यं समजून घेण्यास व प्राप्त करण्यास मदत होते. ध्वनिनुसार वेगळी अक्षरे शिकतांना प्रत्येक अक्षर वेगवेगळे शिकावे लागते. ज्याचा ताण मुलांवर येतो. उपचारात्मक प्रकारात अक्षर किंवा ध्वनीचा समन्वय शिकवला जातो. ज्यामध्ये शब्द ओळखण्यावर भर दिला जातो. पुस्त वाचन घेतले जाते. लेखन कौशल्यासाठी गटागटामध्ये माती किंवा मण्यांनी खेळण्याद्वारे हातांचे व्यायाम घेणे तसेच निबंध लिहून घेणे उपयुक्त ठरत असल्याचा अनुभव आहे. गणितासाठी विविध संकल्पनाचे स्पष्टीकरण, सरावाची पुनारावृत्ती, मांडणीशी अंकांचा संबंध जोडणे. इत्यादी गोष्टीद्वारे प्रयत्न केले जातात. उपचारात्मक हस्तक्षेप उपक्रमात वापरण्यायोग्य अनेक बाबी असल्या तरी तुमच्या मुलाच्या उपयोगी पडणारी एखादी गोष्ट निवडून अमलात आणणे महत्वाचे ठरते. प्रशिक्षकाने तुमच्या मुलासाठी सध्या आणि भविष्यकाळात कोणत्या योजना ठरवल्या आहेत, याची लेखी माहिती पालक या नात्याने तुम्ही घ्यायला हवी. मुलांच्या वाचन, लेखन आणि गणिती क्षमता त्याचबरोबर त्याचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान वाढण्याच्या प्रक्रियेतील मैलाचे दगड कोणते हे तुम्ही समजून घ्यायला हवे. लेखी माहितीनुसार योजनेप्रमाणे मुलाचे शैक्षणिक प्रगती होते आहे का? हे पालकांनी तपासायला हवे. जर तसे होत नसेल तर बालरोगतज्ञ आणि उपचारात्मक प्रशिक्षक यांना आपल्या योजनेप्रमाणे मुलांमध्ये प्रगती न होण्याची संयुक्तिक कारणे माहित असायला हवीत. कदाचित योजना आणि ती राबवण्याची पद्धत यामध्ये बदल करण्याची गरज असू शकते.

मुलांचे व्यवस्थापन करण्यात तुम्ही पालक या नात्याने महत्वाची भूमिका निभावू शकता. एकदा का तुमच्या मुलाच्या समस्या नेमक्या कोणत्या बाबतीत आहेत हे समजले की, अशा मुलांमध्ये नवीन कौशल्य रुजवण्यासाठी तुम्ही विविध पद्धतीने प्रयत्न करु शकता. उपचारात्मक कृती योजना तुम्ही शिकवून घेऊ शकतां आणि घरी तसे प्रयोगही करुन घेऊ शकता.

## प्र.९

### शाळेच्या रचनेमध्ये आणि आयुष्यातही त्याच्यासाठी कोणत्या खास सवलती असाव्या लागतील? तो कधी स्वतंत्र होईल का?

मुलांसाठी शालेय रचनेमध्ये वेगवेगळया तडजोडी करता येतील, त्याचे भाषेचे माध्यम बदलता येईल. मुलाच्या प्राधान्यक्रमानुसार सर्वसाधारणपणे मातृभाषा ही अधिक सोयीचे ठरते. कारण विदेशी भाषेपेक्षा मातृभाषा मुल घरातही जास्त प्रमाणात वापरत असताना ऐकत असते. उपलब्ध असलेल्या विविध तरतुदी मध्ये विषयांची निवड.

(डीस्लेक्सीया असणाऱ्या व्यक्तीने गणित विषय द्यावा, त्याऐवजी दुसरा विषय निवडावा.) परीक्षेत लेखनासाठी जादा वेळ द्यावा, लेखी व तोंडी परीक्षेसाठी सहाय्यक घ्यावा, मुलाची तयारी असल्यास कॅलक्युलेटरचा वापर करावा, इत्यादी जमा खर्च अकाउंटींग साहीत्य अशा त्याच्या अभिरुचीवर आधारीत व्यवसाय करणे त्यांनी टाळावे. ही जीवनभराची स्थिती आहे. आधी उल्लेख केल्यानुसार ते त्याच्या वाचन, लेखन आणि गणिती क्षमतामध्ये विविध उपचाराच्या मदतीने सुधारणा करु शकतात. यासाठीच बालरोगतज्ञ आणि पालकांनी योग्य वेळी सर्व व्यवस्थापन करणे अत्यंत महत्वाचे ठरते) ते बौद्धीकदृष्ट्या अक्षम नसतात. तसेच विशिष्ट क्षेत्रातील अडचणी शिवाय इतर ठिकाणी त्यांना अडचणी येत नाहीत. सहाजिकच इतर क्षेत्रात ते व्यवस्थित असतात. आणि काळजी घेणाऱ्यांवर ते अवलंबून ही नसतात. निश्चितपणे ते स्वतंत्र होऊ शकतात आणि यशस्वीही होऊ शकतात. एस.एल.डी. असलेल्या अनेक व्यक्तींनी प्रसिद्धी मिळवली आहे.

## प्र.१०

### एस.एल.डी. बालकांसाठी भारत सरकार काही करत नाही काय? भारत सरकराच्या विविध मदत गटाविषयी कृपया आम्हाला माहिती द्या. त्याच बरोबर “एन.सी. ई.आर.टी” सारख्या इतर शैक्षणिक संस्थामधील मदत गटाविषयी माहिती द्या. एस.एल.डी. असलेल्या मुलांसाठी योग्य अशा करिअर पर्यायांची माहिती कृपया आम्हाला द्यावी. “एन. सी. ई. आर. टी” आणि महा-विद्यालये त्यांच्या शिक्षणात कोणती मदत करतात? त्यांच्यासाठी करिअरचे उत्तम पर्याय कोणते आहेत?

एस.एल.डी. साठी भारत सरकारने विविध तरतुदी केल्या आहेत. एस.एल.डी. असलेल्या सर्व मुलांसाठी शिक्षण अत्यावश्यक असल्याची तरतूद सरकारने केली आहे. सरकारी शैक्षणिक संस्था आणि नोकऱ्यामध्ये एस.एल.डी. असणाऱ्या लोकांसाठी जागा राखीव ठेवण्यात आले आहेत. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च अँड ट्रेनिंग (एन सी आर टी) डीस्लेक्सीया मुलांसाठी लेखनिकाला परवानगी देते, परीक्षेत उत्तरे लिहीण्यासाठी जादा उत्तरपत्रिका इतर मुलांपेक्षा स्वतंत्रपणे तपासणीसाठी पाठवल्या जातात. जा २०१६ दिव्यांग कायद्यानुसरा या मुलांना पहिलीपासून अनेक सवलती ग्रॅज्युएट होईपर्यंत मिळतात याचा उपयोग पालकांनी करुन घ्यावा.

एस.एल.डी. असलेल्या मुलांसाठी करियर पर्यायांची कमतरता नाही. सध्याच्या अत्याधुनिक जगात एस.एल.डी.च्या मुलांमधील दोषावर तंत्रज्ञान मात करु शकते. आणि त्यामुळे ते विविध करिअर पर्यायाची निवड करु शकतात. कला, ग्राफिक्स आणि डिझायनिंग हे एस.एल.डी.च्या मुलांसाठी चांगले उपयुक्त ठरणारे पर्याय आहेत. इतकेच नव्हे तर, संगीत, फॅशन, पर्यटन, आदरातिथ्य आणि अन्न उद्योग या क्षेत्रांचाही ते विचार करु शकतात. क्रीडा आणि सशस्त्र सेना ही क्षेत्रेही शारीरिक व्यायाम आवडणाऱ्या एस.एल.डी. व्यक्तींसाठी उपयुक्त ठरणारी आहेत.